## प्रेसनोट दिनांक २४/०१/२०१७

## घरफोडी चोरी करणाऱ्या सराईत आरोपीस पिंपरी पोलीसांनी अटक केले बाबत

फिर्यादी नामे अर्जुन निवृत्ती धुमाळ, वय ५४ वर्षे, रा. सर्वोदय कॉम्पलेक्स, मोरया सोसायटी, सी विंग, फ्लॅट नं. ४५, तिसरा मजला, काळभोरनगर, चिंचवड, पुणे यांचे राहते घर दिनांक १०/०१/२०१७ रोजी १४.४५ वा. ते १८.०० वा. चे दरम्यान घरास बंद करून कुलूप लावले असताना कोणीतरी अज्ञात चोरट्याने घराचे दरवाजाचे कुलूप व लॅच तोडून आत प्रवेश करून कि.रू. २,६०,०००/- चे सोन्याचे दागिने, रोख रक्कम व मोबाईल चोरून नेले बाबत दिनांक १०/०१/२०१७ रोजी पिंपरी पोलीस ठाणे येथे तक्रार दिली आहे. पिंपरी पोलीस ठाणे, गुन्हा रजि. नं. २०/२०१७ भा.दं.वि. कलम ४५४,३८० प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

गुन्हयाचा प्रकार गंभीर असल्याने, श्री. गणेश शिंदे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ - ३, पुणे, श्री राम मांडुरके, सहायक पोलीस आयुक्त, पिंपरी विभाग पुणे व विवेक मुगळीकर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पिंपरी पोलीस ठाणे पुणे यांचे मार्गदर्शना प्रमाणे टिम तयार करुन घरफोडी चोरीच्या गुन्हयातील अज्ञात आरोपीचा शोध चालू केला.

दि. २०/०१/२०१७ रोजी पोलीस उप-निरीक्षक श्री. कामुनी, पोलीस उप-निरीक्षक श्री. माने, सहा. पोलीस फौजदार बुधकर, पो.हवा. ३३३ सपकाळे, पो.ना. ८४४ जावळे, पो.ना. ४३८ दिघे, पो.ना. ६८१२ आढारी पो.शि. ८२२७ धस, पो.शि. ८३३८ मगर, पो.शि. ९०१४ वानखडे, पो.शि. ९०५० पिंजरकर असे पिंपरी पोलीस ठाणे येथे हजर असताना, पोउनि कामुनी यांना बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, दाखल गुन्हा हा आरोपी नामे विक्रम ठाकूर याने केला आहे अशी खात्रीशीर माहीती मिळाल्याने सदर माहीती मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो, पिंपरी पोलीस ठाणे, पुणे यांना कळविली असता, त्यांनी सदर इसमास ताब्यात घेण्याचे आदेश दिल्याने लागलीच वरील स्टाफ सह रवाना होवुन मोशी टोलनाका येथे जावुन सदर ठिकाणी शोध घेत असताना, सदरचा इसम पोलीस स्टाफला पाहून पळून जाऊ लागल्याने त्याचा वरील स्टाफने पाठलाग करुन पकडले. त्यास त्याचा नाव पत्ता विचारता त्याने त्याचें नाव विक्रम विठ्ठलसिंह ठाकुर, वय २७ वर्षे, रा. कृष्णानगर, प्लॉट नं. २११, निसर्ग हौसिंग सोसायटी, चिखली, पुणे व मुळगाव हुनेळी, ता. गंगापुर, जि. सोलापुर दक्षिण असे असल्याचे सांगितले.

सदर आरोपीची अंगझडती घेतली असता, त्याचेकडे कि.रू. १,०००/- चा एक एच.टी.सी. कंपनीचा मोबाईल मिळुन आला. त्या मोबाईलबाबत त्याचेकडे विचारपुस केली असता, तो उडवाउडवीची उत्तरे देवु लागला. सदर मोबाईल बाबत शहानिशा केली असता, तो दाखल गुन्ह्यात चोरीस गेलेला मोबाईल असल्याचे निष्पन्न झाला आहे. सदर आरोपीस दाखल गुन्ह्यात दिनांक २०/०१/२०१७ रोजी १८.०० वा. अटक करून त्याची पोलीस कोठडीची रिमांड घेऊन त्याचेकडे अधिक तपास करता, त्याने पिंपरी पोलीस ठाणे १) गुन्हा. रजि. नं. २०/२०१७ भा.दं.वि. कलम ४५४,३८०, २) गुन्हा. रजि. नं. ०२/२०१७ भा.दं.वि. कलम ४५७,३८०, ३) गुन्हा. रजि. नं. १७/२०१७ भा.दं.वि. कलम ४५४,३८०. तसेच वाकड पोलीस स्टेशन ४) गुन्हा. रजि. नं. १०/२०१७ भा.दं.वि. कलम ४५४,३८०, ५) गुन्हा. रजि. नं. ३१/२०१७ भा.दं.वि. कलम ४५४,३८० असे एकुण ५ घरफोडी चोरीचे गुन्हे केल्याचे निष्पन्न झाले आहेत. सदर गुन्ह्यांतील एकुण २९ तोळे सोन्याचे दागिने, एक एचटीसी कंपनीचा मोबाईल हॅंडसेट व एक टॅब असे एकुण किं.रू. ८,२३,०००/- चा माल जप्त केला आहे. सदर आरोपीस दि. २५/०१/२०१७ रोजी मा. न्यायालयाने पोलीस कस्टडी रिमांड मंजुर केली आहे. तसेच सदर आरोपीकडुन आणखी गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता असुन त्याचा तपास पोलीस उप-निरीक्षक श्री. श्रीनिवास कामुनी, पिंपरी पोलीस ठाणे हे करीत आहेत.

सदर कामगिरी श्री. शशिकांत शिंदे, अप्पर पोलीस आयुक्त सो, उत्तर प्रादेशिक विभाग पुणे शहर, श्री. गणेश शिंदे सो, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ - ३, पुणे शहर, श्री राम मांडूरके सो, सहायक पोलीस आयुक्त, पिंपरी विभाग, पुणे शहर, श्री. डॉ. विवेक मुगळीकर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पिंपरी पोलीस ठाणे, पुणे, श्री. मसाजी काळे, पोलीस निरीक्षक (गुन्हे), पिंपरी पोलीस ठाणे, पुणे यांचे प्रत्यक्ष मार्गदर्शनाखाली पोउनि श्रीनिवास कामुनी, हरिष माने, सपोफौ अरुण बुधकर, पो. हवा. राजेंद्र भोसले, शाकीर जिनेडी, नागनाथ लकडे, विवेक सपकाळे, प्रभाकर खणसे, पो.ना. महादेव जावळे, लक्ष्मण आढारी, संतोष दिघे, पो.शि. संतोष भालेराव, शैलेश मगर, दादा धस, उमेश वानखडे, रोहीत पिंजरकर, पो.शि. आरती निकम, पो.शि. नुतन कोंडे व जावेद बागसिराज यांनी केली आहे.

